Adv. Dhananjay Bhonsale
President

Shailesh Tilak
General Secretary

**MAHARASHTRA JUDO ASSOCIATION**
**महाराष्ट्र ज्युदो संघटना**

Affiliated to Judo Fedration of India & Maharashtra Olympic Association
Trust Registration Number: F-3967 Mumbai

568, Narayan Peth, Tilak Wada, Pune- 411 030; gs.mahajudo@gmail.com; +91-94220 29656

**परिपत्रक- 2022** 19.11.2022, पुणे

मा. अध्यक्ष / सचिव,
संलग्न आणि निमंत्रित जिल्हा ज्यूदो संघटना

**विषय: पुनित बालन गृप, पुणे यांच्या सहयोगाने 49 वी ज्युनियर्स (मुले-मुली) राज्य ज्यूदो स्पर्धा, कोहापूर-2022**

महोदय / महोदया,
कळविण्यास आनंद होतो की पुनित बालन गृप पुणे यांच्या सहयोगाने आणि कोल्हापूर जिल्हा ज्यूदो संघटनेच्या सहकार्याने 49 वी ज्युनियर्स (मुले आणि मुली) खुली राज्यस्तरिय ज्यूदो स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या राज्य ज्यूदो स्पर्धेतून फेडरेशनतर्फे रांची येथे दिनांक 16 ते 20 डिसेंबर 2022 दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी आपला महाराष्ट्र "बी" संघ या स्पर्धेतून निवडण्यात येणार आहे.
महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनतर्फे आयोजित 49 वी राज्य ज्युनियर्स (मुले आणि मुली) राज्य ज्यूदो स्पर्धेचा तपशील खालील प्रमाणे;

**1) स्पर्धेचा कालावधी**: दि. 09, 10 आणि 11 डिसेंबर 2022 (शुक्रवार, शनिवार आणि रविवार)

**2) स्पर्धेचे ठिकाण**: दीक्षांत समारोह हॉल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**3) स्पर्धेचे वेळापत्रक**:

| | |
|---|---|
| **दि. 09 डिसेंबर 2022** | **खेळाडुंचे दुपारी 12.00 वाजेपर्यंत आगमन आणि रजिस्ट्रेशन** |
| | **व्यवस्थापक / प्रशिक्षक मिटिंग आणि ड्रॉज- दु. 2.00 वाजता; त्यानंतर 04.00 वाजल्यापासून स्पर्धाप्रारंभ** |
| **दि. 10 आणि 11 डिसेंबर 2022** | **सकाळी 9.00 वाजल्यापासून ते त्या दिवशीचा कार्यक्रम संपेपर्यंतच्या स्पर्धा.** |
| **बक्षिस समारंभ** | **वजनगट झाल्यावर लगेचच त्या गटातील पदक विजेत्यांचा बक्षिस समारंभ आयोजित होईल** |

**सर्व जिल्हा सचिवांना विनंती आहे की, आपल्या संघातील मुले आणि मुली खेळाडूंसह एक व्यवस्थापक यांना दिनांक 09 डिसेंबर 2022 रोजी दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्पर्धास्थळी उपस्थित रहाण्याच्या सूचना द्याव्यात**. खेळाडूंच्या निवासाची सोय प्री आय. ए. एस. प्रशिक्षण केंद्र, मंडलिक पार्कसमोर, राजाराम पुरी येथेकरण्यात आलेली असून खेळाडूंच्या रजिस्ट्रेशनपश्चात कोल्हापूर संघटनेच्या प्रतिंनिधीद्वारे खेळाडूंना त्यांच्या निवासाची (खोली क्रमांक आणि जागा आदी) माहिती दिली गेल्यानंतरच स्पर्धकांनी निवासाठिकाणी जावे.

**4) प्रवेश शुल्क:** रु. 500/- प्रत्येकी. निमंत्रित संघ वार्षिक शुल्क रुपये 3,000/- ज्यांनी भरले नसतील त्यांना या स्पर्धेवेळी भरावे लागतील याची नोंद घ्यावी.
सदरील प्रवेश शुल्क एकूण संघातील खेळाडूंच्या संख्येनुसार रुपये 500/- प्रत्येकी याप्रमाणे बँक ऑफ महाराष्ट्रच्या आपल्या गावातील कोणत्याही शाखेत खाते क्रमांक **20 12 45 16 561** यामध्ये **दिनांक 07 डिसेंबर 2022 पूर्वी** भरावे. बँकेच्या पैसे भरणा पावतीची फोटोकॉपी कोषाध्यक्ष यांना (94227-62631) या क्रमांकावर लगेच व्हॉटसअप करावी आणि मूळ पावती स्पर्धास्थळी एंट्री फॉर्म बरोबर द्यावी. **फक्त प्रवेश शुल्क बँकेच्या खात्यात भरावे** आणि **संलग्नता शुल्क तसेच ओळखपत्राचे शुल्क (रु. 100/- प्रत्येकी) हे स्पर्धास्थळी कोषाध्यक्षांकडे द्यावेत.**

**5) अनामत रक्कम**: प्रत्येक संघास रु 2,000/- अनामत रक्कम जमा करावी लागेल. धुळे येथे घडलेल्या गैरप्रकारामुळे ही रक्कम वाढविण्यात आलेली आहे.

**6)**

**आपल्या असोसिएशनला पुण्याच्या पुनित बालन गृप या प्रतिष्ठित संस्थेने ज्यूदो खेळ आणि ज्यूदोपटू यांच्या अधिक प्रगतीसाठी अर्थसाहाय्य केलेले आहे त्याबद्दल महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन श्री पुनित बालन यांचे मनापासून आभार प्रकट करते. श्री पुनित बालन यांच्या दातृत्वामुळे खेळाडूंसाठी करण्यात येणारी भोजन आणि निवास व्यवस्था ही नि:शुल्क असेल.**

दिनांक 09/12/2022, शुक्रवारच्या सकाळी 08.00 पासून ते रविवार दिनांक 11/12/2022 रोजीच्या रात्रो 08.00 वाजेपर्यंत निवास व्यवस्था करण्यात आलेली आहे. जे संघ दिनांक 11/12/2022 रात्रो 8.00 वाजेपर्यंत रोजी खोली रिकामी करणार नाहीत त्यांचे एक दिवसाचे भाडे अनामत रकमेतून कापून घेतले जातील याची नोंद घ्यावी.

**7) खेळाडू सहभाग:** प्रत्येक जिल्ह्याच्या संघामधील मुले-मुली गटाच्या एका वजनगटामद्धे एकाच खेळाडूस सहभागी होता येईल तसेच प्रवेशिकांमधे दिल्या गेलेल्या वजनगटामध्येच खेळाडूला खेळता येईल.

**8) राज्य संघ निवड**:. स्पर्धेमधील वजनगटातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी सहभागी होण्याकरिता राज्याचा संघ या स्पर्धेतून निवडला जाईल. यासाठी सुवर्णपदक विजेता खेळाडू राज्याचे प्रातिनिधीत्व करेल. ज्या वजनगटामध्ये मुंबईचा खेळाडू प्रथम आला असेल तेथे लगेचच उर्वरित पदकविजेत्यांमधून स्पर्धा घेऊन / परिस्थितीनुरूप निर्णय घेऊन निवड केली जाईल.

**9) एंट्री फॉर्म**: **सर्व एंट्रीज (प्रवेशिका) ऑनलाइन पद्धतीने स्वीकारल्या जाणार असल्याने स्पेलिंगच्या चुका टाळून एंट्री फॉर्म भरला जावा. प्रवेशिकेवर (एंट्री फॉर्मवर) अध्यक्ष अथवा सचिव यांनी स्वाक्षरी करून हा फॉर्म अधिकृत संघ व्यवस्थापकांबरोबर स्पर्धेठिकाणी द्यावा. कोणालाही स्पेलिंगच्या चुकीमुळे कोणतेही प्रमाणपत्र बदलून दिले जाणार नाही. या उपरांत खेळाडूचे नुकसान होवू नये या भूमिकेतून जर प्रमाणपत्र बदलून देण्याची वेळ आलीच तर अशा प्रमाणपत्राचे रुपये 100/- दंडात्मक शुल्क भरावे लागेल, परंतु अशा जिल्हा संघटनेच्या सचिवांना कार्यकारिणीला लेखी उत्तर देण्याची तयारी ठेवावी लागेल.** ही नामुष्की टाळण्यासाठी ऑनलाइन एंट्री (प्रवेशिका) भरण्यापूर्वी खेळाडूंची यादी करताना स्पर्धकाच्या नावाचे स्पेलिंग बरोबर असल्याची संबंधित खेळाडूकडूनच खात्री करून घ्यावी यासह खेळाडूचा इतर आवश्यक तपशील आणि पासपोर्ट आकाराचा फोटो तयार ठेवावा आणि मगच फॉर्म ऑनलाईन सबमिट कण्यास सुरुवात करावी.

ऑनलाईन सबमिशन करण्याच्या प्रक्रियेचा आपण मागील दोन वर्षांपासून अवलंब करत असल्याने इथे परत तो तपशील दिला जाणार नाही परंतु आवश्यक वाटल्यास ऑनलाइन फॉर्म भरण्याबाबतचे मागील स्पर्धेचे परिपत्रक पहावे आणि अचूक एंट्री भरावी. जिल्ह्याने एंट्रीद्वारे पाठविलेल्या खेळाडूंची नावे पुढील कार्यवाहीसाठी म्हणजे ओळखपत्र, लॉटससाठी वापरली जाऊन त्याच नावांची खेळाडूंची यादी ओळखपत्रे आणि प्रमाणपत्रे कम्प्युटरच्या माध्यमातून प्रिंट करण्यासाठी वापरली जाईल.

**(ऑनलाइन प्रवेशिका भरताना आपणास काही अडचण आली तर लगेचच श्री आदर्श शेट्टी – 98338-57072 यांच्याशी संपर्क साधावा.)**

**10) प्रवेशिकेसोबत आवश्यक कागदपत्रे**;

एंट्रीबरोबर प्रत्येक खेळाडूचे जन्मतारखेचे मूळ (ओरिजिनल) दाखले आणि त्यांच्या झेरॉक्स-प्रती जमा करावयात तसेच एक पासपोर्ट आकाराचा फोटो जमा करावा. मूळ कागदपत्रे पाहिल्यावर झेरॉक्स दाखले प्रमाणित करून MJA रेकॉर्डसाठी ठेवले जातील त्यामुळे मूळ कागदपत्रे जिल्हा संघ व्यवस्थापकांकडे **लगेचच** स्वतःच्या ताब्यात घ्यावीत. त्यामुळे संघ व्यवस्थापकांनी झेरॉक्स दाखले सत्यापित झाल्यावर मूळ दाखले आठवणीने न्यावेत. ही जबाबदारी संघ व्यवस्थापकांची असेल. ते संघ व्यवस्थापकांनी मूळ दाखले परत न नेल्यास / गहाळ झाल्यास राज्य ज्यूदो संघटनेचे कोणतेही पदाधिकारी, आयोजक संघटनेचे पदाधिकारी अथवा स्पर्धेसाठी नेमलेले कोणतेही तांत्रिक अधिकारी जबाबदार असणार नाहीत याची नोंद घ्यावी आणि संघ व्यवस्थापकांना काम झाल्यावर दाखले परत घेण्याच्या सूचना जिल्हा सचिवांनी गांभिर्याने द्याव्यात.

**प्रवेशिका अपलोड करण्याची अंतिम तारीख 07 डिसेंबर 2022 आहे**. आपण दिनांक 07/12/2022 रोजीच्या रात्रो 11.59 पर्यन्त आपल्या जिल्ह्याची एंट्री अपलोड शकता, त्यानंतर एंट्री स्वीकारणे सिस्टिम बंद करेल. उशीराच्या एंट्रीस अनुमती नाही.

**11) जन्मदाखले**-जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात जेएफआयच्या नियमाप्रमाणे खालील तीनही मूळ अधिकृत प्रतिमधे वयाचा दाखला आणणे गरजेचे आहे. याशिवाय खेळाडूला खेळण्यास परवानगी मिळणार नाही.

**अ)** महानगरपालिका / पंचायत समिती अथवा समरूप शासकीय अधिकृत व्यक्तिद्वारा जारी वयाचा दाखला / विभागातील सक्षम मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेला दाखला,

**ब)** मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेले प्रमाणपत्र यामधे जन्मतारीख, वडिलांचे नाव, विद्यार्थ्याचा शिकत असलेला वर्ग, पत्ता, टेलिफोन क्रमांक, आणि शाळेचा फॅक्स आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असायला हवा. ही माहिती विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोवर रबरी शिक्का आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकीत (अटेस्टेड) केलेले हवे.

**क)** भारत सरकारतर्फे जारी केलेल्या आधार कार्डाची मूळ प्रत

हे तीनही दाखले अनिवार्य असून याशिवाय खेळाडूस खेळू दिले जाणार नाही.

(दाखल्याच्या प्रमाणासाठी जेएफआयचे स्पर्धेसंदर्भातील मूळ इंग्रजी परिपत्रक ग्राह्य धरले जाईल. खेळाडुंचे वय हे कॅलेंडर वर्षाप्रमाणे जानेवारी ते डिसेंबर असे गृहीत धरले जाईल.) आपल्या संघातील दहावी / बारावीच्या विद्यार्थ्यांची नावे प्रवेशिकेशिवाय वेगळी देणे आवश्यक असल्याने सोबतच्या जोडलेल्या नमूनाफॉर्ममध्ये ती द्यावीत.

**वयाचे योग्य आणि पुरेसे दाखले स्पर्धेसाठी आणणे ही बाब अजूनही काही जिल्हे गांभिर्याने घेत नसल्याचे धुळे येथील कॅडेट स्पर्धेदरम्यान लक्षात आले आहे. तेंव्हा जिल्हा सचिवांनी याची नोंद घ्यावी की, योग्य आणि वर विशद केलेली कागदपत्रे ज्या खेळाडूकडे नसतील या खेळाडूंना आपण खेळण्याची अनुमती देयार नाही.**

**12) स्पर्धा नियम**: स्पर्धा जेएफआयच्या नूतन प्रचलित नियमांप्रमाणे आयोजिल्या जातील.

**13) रिपोर्टिंग**: प्रत्येक जिल्ह्याच्या संघांनी स्पर्धास्थळी दि. 09/12/2022 रोजी दु. 12.00 पर्यन्त पोहोचणे आवश्यक आहे **तर सर्व पंचांनी म्हणजे टेक्निकल ऑफिशियल आणि असिस्टंट टेक्निकल ऑफिशियल यांनी, दि. 08/12/2022 रोजी दुपारी 04.00 वाजेपर्यंत पोहोचावे तसेच पंचांनी स्पर्धास्थळी पोहोचल्याचे स्पर्धा संचालक सौ स्मिथा शेट्टी यांना कळवणे गरजेचे आहे**.

**14) वजनगट:**

वर्ष **2002-2007** मध्ये जन्मलेले आणि 15 वर्षे पूर्ण आणि 21 वर्षाखालील मुले आणि मुली खेळाडू

**18 वर्षाखालील खेळाडूंच्या पालकांकडून हमीपत्र जिल्हा संघटनांनी घ्यावे, त्याशिवाय 18 वर्षाखालील खेळाडूंना जिल्हा चाचणी स्पर्धेत खेळू देवू नये. याचा नमूना या परिपत्रकासोबत दिला आहे.**

| **मुले - आठ वजनगट** | | **मुली - आठ वजनगट** |
|---|---|---|
| -55 किलो: 55 किलोपर्यंत | | -44 किलो: 44 किलोपर्यंत |
| -60 किलो: 55 किलोवर आणि 60 किलोपर्यंत | | -48 किलो: 44 किलोवर आणि 48 किलोपर्यंत |
| -66 किलो: 60 किलोवर आणि 66 किलोपर्यंत | | -52 किलो: 48 किलोवर आणि 52 किलोपर्यंत |
| -73 किलो: 66 किलोवर आणि 73 किलोपर्यंत | | -57 किलो: 52 किलोवर आणि 57 किलोपर्यंत |
| -81 किलो: 73 किलोवर आणि 81 किलोपर्यंत | | -63 किलो: 57 किलोवर आणि 63 किलोपर्यंत |
| -90 किलो: 81 किलोवर आणि 90 किलोपर्यंत | | -70 किलो: 63 किलोवर आणि 70 किलोपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| -100 किलो: 90 किलोवर आणि 100 किलोपर्यंत | | -78 किलो: 70 किलोवर आणि 78 किलोपर्यंत |
| +100 किलोवर | | +78 किलोवर |

**15) वय सत्यापन चांचणी (Age verification Test -AVT**)
मागील काही वर्षीपासून फेडरेशनने वयाच्या सत्यापनाविषयी चाचणी करण्याची प्रक्रिया अनिवार्य केलेली आहे. या चांचणीशिवाय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. आपण जरी राज्यस्पर्धेसाठी ही चांचणी अनिवार्य करणार नसलो तरी राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडल्या गेलेल्या खेळाडूंनी मात्र ही चांचणी करणे **<u>अत्यावश्यक</u>** आहे. त्यामुळे, राज्याच्या संघामध्ये जे खेळाडू निवडले जातील त्या खेळाडूंनी या स्पर्धा संपल्यावर लगेचच ही चांचणी त्यांच्या गावी करावी अन्यथा त्यांना राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. **<u>शक्यतो</u>** <u>ही चाचणी शासकीय दवाखान्यात करावी</u>. जर तशी सोय आपल्याकडील शासकीय दवाखान्यात उपलब्ध नसेल तरच ती इतर ठिकाणी करावी. याचे कारण म्हणजे गतवर्षी खेलो इंडिया स्पर्धादरम्यान काही खेळाडूंना प्रमाणित चांचणी पुरावा असूनही अडचणीचा सामना करावा लागला आणि राष्ट्रीय स्पर्धेत खेळण्यापासून मुकावे लागले. अशा वेळेस शासकीय दवाखान्यातील पुरावा हा सबळ ठरू शकतो.

**16)** आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याच्या संघामध्ये निवडल्या गेलेल्या खेळाडूंपैकी काही खेळाडू स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी सूचना देताना हजर नसतात, तेंव्हा संबंधित खेळाडू अनुपस्थित राहू नयेत याची काळजी संघ व्यवस्थापकांनी घ्यावी आणि या मिटिंगसाठी खेळाडू उपस्थित रहाण्याची ताकीद द्यावी.

**17)** केंद्र सरकार अँटी-डोपिंगबाबत कडक धोरण राबवत असल्याने डोपिंग टेस्ट गांभिर्याने केल्या जातात. काही दिवसांपूर्वी डोपिंग चाचणी करून खेळलेल्या खेळाडूंना शोधून त्यांच्यावर खेळण्यास बंदी आणल्याचेही सर्व राज्य संघटनांना फेडरेशनने कळवले आहे. त्यामुळे आपण आपल्या जिल्ह्याच्या संघामधील प्रत्येक खेळाडूकडे जातीने लक्ष देवून खेळाडू अशा गैर गोष्टी करत नाहीत याची खातरजमा करावी. याची सुरुवात राज्य स्पर्धेपासून करण्याचाही शासनाचा मानस आहे याची जाणीव खेळाडूंना करून द्यावी जेणेकरून **<u>मेडलच्या मोहापायी खेळाडूने आपले संपूर्ण करियर वाया घालवण्यापासून आपण सर्वांनी परावृत्त करावे</u>**.

**18)** राज्य संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूला राष्ट्रीय स्पर्धा सहभाग बंधनकारक आहे. संयुक्तिक कारणाशिवाय अथवा योग्य वेळी पूर्वकल्पना न देता राष्ट्रीय स्पर्धेस अनुपस्थित राहून पर्यायाने राज्याच्या खेळाडूंवर अन्याय करणाऱ्या खेळाडूवर निलंबनाची आणि आर्थिक दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव राज्य संघटनेनी पारित केला आहे.

**19)** महाराष्ट्र ज्यूदो संघटना कोणत्याही परिस्थितीत, कोणाचेही गैरवर्तन कदापिही सहन करणार नाही. स्पर्धा आणि निवास या ठिकाणी असभ्यपणा, मोठयाने आवाज करणे, मोबाईलवर इतरांना त्रास होईल असा त्याचा वापर करणे इत्यादी गैरवर्तन कोणीही करू नये. निवास, भोजन आणि खेळण्याचा परिसर येथे गैरवर्तन केल्याची माहिती कळवण्याची जबाबदारी सामायिक राहील. **याचबरोबर मालमत्तेचे नुकसान कोणीही आणि कोणत्याही कारणाने केल्यास त्या संबंधित संघाकडून तो खर्च वसूल तर केलाच जाईल शिवाय संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. महाराष्ट्राच्या संघातील त्या जिल्ह्याचे स्थान जाणे अथवा <u>जिल्ह्याचे निलंबनदेखील</u> होवू शकते याची गंभीर नोंद घेऊन, आपल्या शिस्तप्रिय खेळाची परंपरा जबाबदारीने सर्वांनीच पुढे न्यावी ही सर्वांनाच आग्रहाची विनंती.** यासाठी संघव्यवस्थापक आणि संघाबरोबरील प्रशिक्षकांना प्रत्येक जिल्ह्याच्या सचिव / अध्यक्षांनी जागरूक रहाण्याच्या सूचना द्याव्यात.
**मॅटवर येवून न खेळता वॉकओव्हर देणाऱ्या खेळाडूस / संघास दरवेळी रु 1,000/- दंड केला जाईल.**

**20)** संघातील खेळाडूंच्या विम्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्याची असेल. खेळाडूंना स्पर्धेच्या कालावधीमध्ये अथवा स्पर्धेकरिता येताना अथवा स्पर्धेहून आपल्या गावी परतताना कोणत्याही घटनेमुळे होणाऱ्या इजांची / दुर्घटनांची जबाबदारी संयोजक संघटना अथवा महाराष्ट्र ज्यूदो संघटनेवर किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर रहाणार नाही. मात्र स्पर्धेदरम्यान प्राथमिक उपचाराची सोय आयोजकांकडून स्पर्धा ठिकाणी करण्यात येईल. पुढील गंभीर उपचाराचा खर्च आणि सोय ज्या-त्या संघास करावी लागेल याची नोंद घ्यावी.

**21)** सभासद नसणाऱ्या जिल्हा संघटनेस स्पर्धेमधे सहभाग देण्या - न देण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनकडे सुरक्षित असेल.

**22)** प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडू हा त्या जिल्ह्यातील रहिवासी असायला हवा. परवानगीच्या आवश्यक त्या कागदपत्रांशिवाय कोणताही खेळाडू स्वत:चा जिल्हा सोडून इतर जिल्ह्यातून खेळताना आढळल्यास त्यावर कारवाई होईल तसेच त्यास खेळण्याची परवानगी देणाऱ्या संबंधित क्लब / जिल्हयावरही कारवाई होईल.

**23)** व्यवस्थापक / प्रशिक्षक संघासोबत नसलेल्या संघास रहाण्याची जागा उपलब्ध होणार नाही.

**24)** आयजेएफच्या / जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) अथवा कोणत्याही प्रसंगी रेफरीच्या निर्णयावर आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे, रेफरीचे लक्ष विचलित करणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येवू शकते. यासाठी स्पर्धा दरम्यान प्रशिक्षकासाठी आसनव्यवस्था केली असते त्याच खुर्चीवर जिल्ह्याच्या प्रवेशिकेवर नाव असलेल्या अधिकृत व्यक्तीनेच बसायचे आहे, इतर कोणासही या ठिकाणी बसण्याची परवानगी नाही.

**25)** रेफरींचा निर्णय अंतिम असेल. रेफरीच्या निर्णयाबाबत आक्षेप असल्यास <u>फक्त संघाच्या व्यवस्थापकांनी</u> या संदर्भात मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याशी संपर्क साधावा. आक्षेप असलेल्या सामन्याचे रेकॉर्डिंग पहाताना राज्य संघटनेच्या अधिकृत कॅमेरामधीलच रेकॉर्डिंग पाहिले जाईल, वैयक्तिक मोबाईलचे रेकॉर्डिंग पहिले धरले जाणार नाही.

**26)** राष्ट्रीय स्पर्धांसाठी जेएफआयच्या नियमाप्रमाणे असलेली ज्यूदोगी ग्राह्य धरण्यात येतात, यासाठी याची व्यवस्था राज्याच्या निवडल्या गेलेल्या संघातील खेळाडूंना करावी लागेल. मात्र राज्य स्पर्धेसाठी विशिष्ट कंपनीची ज्यूदोगी हा निकष आवश्यक नसून फक्त फेडरेशनच्या नियमाप्रमाणे ज्यूदोगीचा आकार आणि स्वच्छतेच्या बाबतीत निकष कायम असेल. महाराष्ट्र ज्यूदो संघटनेचा आग्रह आहे की खेळाडूंनी IJF/JFI यांच्या मान्यताप्राप्त ज्यूदोगी नेहमीच वापराव्यात.

**27)** सर्व पत्रव्यवहार संघटनेच्या लेटरहेडवर प्राधिकृत व्यवस्थापक अथवा सचिव यांच्या स्वाक्षरीने व्हावा.
आयजेएफच्या / जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येवू शकते.

**सर्व जिल्हा संघटनांनी कृपया याकडे लक्ष द्यावे की, आपल्या असोसिएशनद्वारे आयोजित सर्व राज्य स्पर्धांमध्ये कोणतेही 'विशेष खेळाडू' अर्थात 'स्पेशल प्लेयर्स' म्हणजे 'मुक, अंध आणि बधिर आदी खेळाडू' सहभागी होवू शकणार नाहीत. कारण या खेळाडूंसाठी त्यांच्या स्पर्धा संदर्भात विशेष नियम असतात. तरी देखील हे विशेष खेळाडू आपल्या सर्वसाधारण स्पर्धांमध्ये खेळू द्यावेत असा काही प्रशिक्षकांचा आग्रह आहे आणि म्हणून आपण आपल्या ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडिया या भारतातील शिखर संघटनेकडे हा प्रश्न / शंका संदर्भित करून या बाबत मार्गदर्शन करण्याची विनंती केलेली आहे. फेडरेशनकडून उत्तर आल्यानंतर त्याप्रमाणे तो निर्णय सर्वांना अवगत करून दिला जाईल आणि आपल्या स्पर्धांसाठी लागू केला जाईल. त्यामुळे अशा खेळाडूंच्या पालकांना विनंती की, त्यांनी फेडरेशनकडून निर्णय येईतो कृपया संयम बाळगावा. सर्वच ज्यूदो खेळाडूंच्या सुरक्षेची राज्यातील शिखर संस्था म्हणून आपल्याला काळजी आहे आण म्हणूनच या केवळ एका भावनेतून आपण हा प्रश्न आपल्या फेडरेशनकडे मांडला आहे.**

महाराष्ट्र ज्यूदो संघटनेच्या सर्व उपक्रम/कार्यक्रमाबाबत माहिती सर्वांना कायम उपलब्ध व्हावी यासाठी इंटरनेटवर **www.mahajudo.com** हे संकेतकेंद्र उपलब्ध असून इच्छुकांनी कृपया यावरून माहिती घ्यावी. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी श्री शैलेश टिळक (महासचिव) - 94220-29656; श्री रवी पाटील (चेअरमन-टीसी) - 95949 15407; श्री दत्ता आफळे (सचिव-टीसी) - 94231 50231 महाराष्ट्र ज्यूदो संघटना, स्पर्धा संदर्भात स्पर्धा संचालक सौ स्मिथा शेट्टी ((98192 57816) आणि निवास व्यवस्थेसंबंधात सौ वृशाली लिंग्रस (98343 55631); श्री संतोष बाबर (88889 14777); श्री धवल पाटोळे (99602 92700); श्री विक्रम पाटोळे (98603 80003) यांच्याशी संपर्क साधावा.

कळावे,

आपला विश्वासू,






शैलेश टिळक
महासचिव
महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशन

प्रति,
सचिव
जिल्हा ज्यूदो संघटना
विषय: ज्यूदो स्पर्धेच्या सहभागासाठी खेळाडूच्या पालकांचे परवानगी पत्र
महोदय / महोदया,

मी या पत्राद्वारे माझा पाल्य (पूर्ण नाव) कुमार / कुमारी इयत्ता
यास महाराष्ट्र ज्यूदो असोसिएशनद्वारे दिनांक 09 ते 11/12/2022 दरम्यान 49 वी ज्युनियर्स (मुले-मुली) राज्य ज्यूदो स्पर्धा-2022**,** कोल्हापूर येथे आयोजित होणाऱ्या स्पर्धेच्या पूर्व तयारीचा भाग असलेल्या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेमध्ये तसेच खुल्या राज्य स्पर्धेमध्ये ज्यूदो खेळाडू म्हणून सहभागी होण्यासाठी माझा पाल्य शारीरिकदृष्ट्या पुर्णपणे सक्षम असून त्यास ऐकणे, पहाणे आणि बोलणे या क्रियांबाबत कोणतेही अंशत: देखील कमतरता/व्यंग नाही. त्यामुळे मी त्यास या खुल्या ज्यूदो स्पर्धेमध्ये सहभागी होण्याची माझी परवानगी देत आहे. मला ज्यूदो खेळातील तसेच खेळण्यासाठी करण्यात येणाऱ्या प्रवासादरम्यानच्या जोखीमींची पूर्वकल्पना जिल्हा संघटनेद्वारे दिलेली आहे.

मला हेही माहिती आहे की, माझ्या पाल्याचे प्रशिक्षक, संघाचे व्यवस्थापक आणि जिल्हा अथवा राज्य संघटनेचे पदाधिकारी माझ्या पाल्याच्या सुरक्षेसाठी आवश्यक आणि योग्य ती सर्व काळजी घेत आहेत.

योग्य ती सर्व काळजी घेऊनही, जर कदाचित कोणतीही अप्रिय घटना घडल्यास मी माझ्या पाल्याचे प्रशिक्षक, संघाचे व्यवस्थापक आणि जिल्हा अथवा राज्य ज्यूदो संघटनेचे पदाधिकारी यांना जबाबदार धरणार नाही.

मी या पत्राद्वारे अशीही हमी देतो की, माझा पाल्य सुरक्षिततेचे सर्व नियम काटेकोरपणे पाळेल आणि त्यांनी ते आयुष्यात नेहमीच पाळावेत यासाठी मी त्याला मार्गदर्शनही केलेले आहे.

कृपया माझ्या पाल्याबाबतीत खालील वैद्यकीय नोंद ठेवावी; (लागू नसल्यास लागू नाही असे लिहावे)

ॲलर्जी: ____________________

नेहमीची औषधे घेत असल्यास: ____________________

काही आजार / जखम ____________________

टिटॅनियसचे इंजेक्शन कधी घेतले आहे. ____________________

रक्त गट ____________________

पालकांची स्वाक्षरी: __________________________

पालकांचे नाव :- ____________________________________
तारीख: /12/2022; ठिकाण: ____________

# 49 वी ज्युनियर्स (मुले-मुली) राज्य ज्यूदो स्पर्धा, कोल्हापूर
# आणि
# राष्ट्रीय निवड चांचणी स्पर्धा-2022
# दिनांक : 09 ते 11 डिसेंबर 2022

**जिल्हा ज्यूदो संघटनेचे नाव:** ____________________________________________

**दहावीच्या विद्यार्थी खेळाडूंची यादी**

| क्र. | खेळाडूचे पूर्ण नाव | जन्मतारीख | वयोगट | वजनगट | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**बारावीच्या विद्यार्थी खेळाडूंची यादी**

| क्र. | खेळाडूचे पूर्ण नाव | जन्मतारीख | वयोगट | वजनगट | शाळेचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

सचिवांचे नाव, स्वाक्षरी आणि रबरी शिक्का: